# उपविभागीय अधिकारी,मेहकर यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक-07268- 224532 E-mail- sdomehkar25@gmail.com

-: जाहिर नोटीस :-

---

**मौ.पिंपळनेर ता.लोणार** येथील सर्व लोकांना हय नोटीसीने कळविण्यात येते की,उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,मेहकर यांनी खालील अनुसुचीमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे जमिनधारकांच्या जमिनी मा.राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे नांव उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,मेहकर यांना महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाचे शासन परिपत्रक क्र.एल.क्यु.एन.-18/2004/प्र.क्र./162/अ-2 मंत्रालय,मुंबई-32 दिनांक 06/06/2006 व महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाचे शासन परिपत्रक संकीर्ण 03/2015/प्र.क्र.34/अ-2 दिनांक 30/09/2015 मधील तरतुदीनुसार खाजगी वाटाघाटीने **मौ.पिंपळनेर पाझर तलाव क्र.2 च्या कामासाठी** व सार्वजनिक प्रयोजनासाठी खरेदी करण्याचे प्रस्तावीत केलेले आहे. खालील अनुसुचीमध्ये संबंधीत खरेदी करावयाच्या जमिनीच्या जमिन मालकांचे नांव,गट नंबर व संपादन क्षेत्र इत्यादी तपशिल दिलेला आहे. सदर जमिनीबाबत जमिन मालकांचे हिश्श्यावर हक्क,हितसंबंध,दत्तक,वारसाहक्क,गहान,दान,बोजा,बाकी,भाडेपटटा,कर्ज,बक्षीसपत्र,जप्ती,करार-मदार अथवा इतर कोणाचाही हक्क असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन 10 (दहा) दिवसांचे आंत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मेहकर या कार्यालयामध्ये समक्ष दाखल करावी.

जर मुदतीमध्ये कोणीही हक्क,हितसंबंध किंवा आक्षेप व हरकत दाखल केले नाही तर कोणाचेही काही एक म्हणणे किंवा हरकत नाही असे समजुन सदर मिळकतीवर कोणाचा बोजा आणि हितसंबंध नाही असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूरण करण्यात येईल व त्यानंतर येणा-या हरकती आमच्या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास सदर जमिन मालकांची मिळकत निर्बंध व बिनाजोखीमीची असल्याचे समजुन हे कार्यालय मा.राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे वतीने खरेदीचा व्यवहार केव्हांही पूर्ण करेल व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

**-: अनुसुची :-**

**(मौ.पिंपळनेर पाझर तलाव क्र.2 च्या कामासाठी)**

**भूसंपादन प्रकरण क्रमांक 4/2013-14 (नविन 12/65/2015-16 ) मौ.पिंपळनेर ता.लोणार जि.बुलडाणा**

| अ.क्र. | जमिन मालकाचे नांव | स.नं./गट क्रमांक | एकूण क्षेत्र हे.आर | खरेदी करावयाचे क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वर महादु लोखंडे | 250 | 7.06 | 1.67 |
| 2 | विठोबा राघो देबाजे | 258 | 2.57 | 0.18 |
| | एकूण | -- | -- | 1.85 |

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी,मेहकर**